# प्रकरण २ रे

## -: परिचयात्मक माहिती :-

**आवश्यकता :-**

१९ व्या शतकात ब्रिटीश अंमल स्थिर झाल्यावर काही उदार मताच्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या खटपटीमुळे आणि राज्यकर्त्यांना राज्य करणे सोयीचे व्हावे म्हणून त्यांनी राबविलेल्या योजनांमुळे महाराष्ट्रात एक प्रबोधनाची लाट आली. समाजाच्या सर्व थरांत एक खळबळ माजली. त्यातून काही प्रश्न उद्भवले.

"या काळात उद्भवलेल्या अनेक सामाजिक प्रश्नांचे आपल्या मनातील मतांस अनुसरून विवेचन करणाऱ्या व त्या काळात प्रकाशात आलेल्या एका गुणी नाटककाराचे नावही आज कोणाच्या लक्षात राहिलेले दिसत नाही. नारायण बापूजी कानिटकर हे लोकप्रिय मराठीतील एक दर्जेदार नाटककार होऊन गेले. इ.स. १८८० ते १९१७ या कालखंडातील गद्य नाटकाचे ते सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी होते."[१]

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात नाटककारांपैकी एक गुणी पद्धतीचे सामाजिक नाटककार म्हणजे श्री. नारायण बापूजी कानिटकर. यांच्या नाटकांनी तत्कालीन लोकांमध्ये खळबळ उडवून दिली होती. सामाजिक सुधारणेला त्यांच्या नाटकांमुळे काही मदत झाली होती. म्हणून त्यांच्या नाटकांमुळे व परिवाराबद्दल उपलब्ध माहिती मिळविणे जरूर वाटल्याने आहे.

बापूजी (महादेव) गोपाळ कानिटकर १७९८ ते १८७१

| | |
|---|---|
| वासुदेव बापूजी १८२७ ते १९०४ | नारायण बापूजी १८५१ ते १८९७ |
| गोविंद वासुदेव १८५४ ते १९१८ | १) गजानन नारायण |
| | २) चिमुताई (गोडबोले) |
| | ३) काशीबाई |

पूर्वजांविषयीच्या आख्यायिका :-

नारायण बापूजींचे पूर्वज कोकणातल्या गावी राहत असत. पुढे बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या कारकीर्दीत घाटावर येऊन साईखेड्याजवळ या गावी त्यांनी वस्ती केली. कालांतराने मराठ्यांचे सेनापती म्हणून प्रसिद्धीस आलेले हरिपंत फडके हे कान्हिटकरांचे वंशज असत. पानिपतच्या युद्धापूर्वी काही कान्हिटकर मंडळी उत्तर हिंदुस्थानात दौलतीच्या दिशेने कामासाठी गेली होती. संग्रामातील धामधुमीनंतर काही घरे या कान्हिटकर यांनी मराठ्यांचे दप्तर तेथून दक्षिणेत आणले, हे दप्तर इतिहासदृष्ट्या महत्त्वाचे होते. पुढे याचा उपयोग इतिहासाचार्य राजवाडे यांनी करून घेतला.

एक अशा कान्हिटकरांपैकी नारायणराव हे स्वतः बाजीरावांच्या काळात असल्याच्या रीतीने पुढे आले. त्याकाळी नानासाहेब पेशव्यांच्या एका मुलाने पराक्रम गाजवलेला होता. पेशव्यांनी त्यांच्या कौतुकाची विशेष कामगिरी पार पाडली. त्या मुलाला ठार करून त्यांना त्यांचा हात मिळाला, पेशव्यांनी असा न्याय दिला - "तुमचा वंश वाढणार नाही - वाढला तर तुमच्या वंशाला ही दौलत लाभणार नाही." तेव्हा त्यांनी उत्तर दिले की "माझ्या वंशामध्ये जन्मणारे प्रत्येकाने अविवाहित राहावे, त्यांच्या वाट्याला राजकीय वाटा ना यावा म्हणाले असत."

या शापाच्या भीतीने पुढे पंतांनी पेशव्यांच्या चाकरीत काम केले. पेशव्यांनी या कामगिरीबद्दल पंतांना इंदापूरच्या भागात वीसएक गावांचे इनाम दिले.

पुढे नारायणराव आर्थिक हेराफेरीत येऊन सावकारांच्या कर्जात बुडाल्या होत्या. पंतांनी स्वतःविषयी सावकारांच्या जाचातून सुटावे होते, तेव्हा त्यांना पूर्णपणे दुष्काळाचा साक्षात्कार झाला. त्या दुष्काळात

मंदिरे

आवश्यकता वाडा बांधला, हा वाडा अजूनही अस्तावी पडला आहे.

अशा प्रकारे भास्करपंतांनी खूप संपत्ती मिळविली. त्यांनी मिरज - शासनाचा वाडा, इनामी जमीन पुण्यात फडके यांच्या वाड्याशेजार एक राहता वाडा शिवाय अन्य १४ वाडे, बागा, दुकाने, अशी मालमत्ता होती. याशिवाय आश्रमास धर्मपत्नीचे, आप्तांचे व काकांचे अशी तीन मंदिरे बांधली, कृष्णाकाठी माहुलीस घाट बांधला. मंदिरांसाठी स्थापना केली, मोठी बांधल्या, माहुली बांधले कृष्णेपलीकडचा रस्ता फरसबंदी केला. बाजार उठविली, सर्व आश्रमात दाखल कुटुंबांच्या अन्न वस्त्र निवाऱ्याची तरतूद केली. एवं, भास्करपंतांनी धार्मिक व धर्मकार्यार्थ दोन लाख रुपये खर्च केल्याची नोंद आश्रमाच्या दप्तरात आढळते.

तथापि काळाच्या ओघात भास्करपंतांनंतरच्या दोन पिढ्यांत ही संपत्ती नष्ट झाली. स्वतः भास्करपंत ज्या देवांची पूजा करीत त्यांची किंमत १ लाख रु. ची होती. त्यांनी कर्ज काढून एक लाख खर्च केले, पुण्यास ते पुढे आले असता त्यांना लोकांना त्यांच्या धनाविषयी अभिलाषा उत्पन्न झाली म्हणून पूजा झाल्यावर फक्त घरचे देव हलवावे म्हणून घेऊन ते परतले.

अशा प्रकारे, अखेर भास्करपंतांचा कोणताही वारसा टिकला नाही. त्यांनी आपल्या तीन भावांना वाटून दिलेली संपत्ती तीन पिढ्यांपर्यंत पुरली. हत्ती, घोडे, पालख्या सर्व काही होते पण नंतर विपन्नावस्था आली. पुढील वंशात दोन वेडे ही निघाले, त्यांनी घरातील चीजवस्तू नव्हे तर शिल्लक स्वयंपाकही लोकांना देऊन टाकला. एक मात्र आहे भास्करपंतांनी बालपणी गुरुजींच्या शिष्यांना दिलेल्या वचना- प्रमाणे निष्ठेने, कर्तृत्वाचे कोणी निघाले नाही. आपापले जीवन फक्त उदरनिर्वाह करणारेच वंशज निघाले.

पंतांच्या चौथ्या पिढीला पूर्वापार संपत्तीच्या फक्त आठवणीच उरल्या. महादेव पैठण अर्थ आपटे यांच्या तीन शाखा झाल्या. हे सर्वांसाठी

प्रथम मुंबईस व मग औंधास गेले, तेथे ते आबासाहेब पंतप्रतिनिधींच्या पेढीवर होते. हे काम तेथे बापू होते तोपर्यंत त्यांनी केले. पहिल्या पत्नीचे अपत्य म्हणजे रा.ब. वासुदेव बापूजी कानिटकर. वासुदेव लहान असतानाच त्यांची आई वारली म्हणून बापूसाहेबांनी दुसरी बायको केली. वासुदेवच्या मुंजीनंतर तीही देवाघरी गेली म्हणून मग तिसरी बायको यमुनाबाई केली. तिलाही मुलगा झाला नाव ठेवले नारायण पण नारायण साल दिडवर्षाचा असतानाच दुर्दैवाने त्याची आई निवर्तून गेली.

बापूजी औंधाहून सुरतेस व तेथून मुंबईस आले. कारण आबासाहेब पंतप्रतिनिधींची पेढी मुंबईस ठाकूरद्वार भागात होती. बापूजींचे बिऱ्हाडही याच भागात होते. याच भागात नारायणाचा जन्म झाला व साल दिडसालच तो पोरका झाला.

नारायण बापूजींचे थोरले बंधू त्यांच्यापेक्षा २५ पंचवीस वर्षांनी मोठे होते. साहजिकच गोविंद वासुदेव हा पुतण्या आणि नारायण बापूजी ह्यांचे शिक्षण बरोबरच सुरू झाले होते. आपल्यापेक्षा दोन वर्षांनी लहान असलेल्या आपल्या पुतण्याबरोबर हा पोरका नारायण मुंबईत विनायक जगन्नाथ शंकरशेटच्या शाळेत जात असे. पुढे पुण्यास आल्यावर त्यांचे इंग्रजी शिक्षण सुरू झाले. त्यासाठी ते विश्रामबागवाड्यातील हायस्कूलात जात असत.

गोविंद वासुदेवच्या आधी एक वर्ष नारायण मॅट्रिक पास झाला (१८८८). इंजिनियरिंग कॉलेजमध्ये पुण्यास दाखल झाला पण दादासाहेब म्हणजे रा.ब. वासुदेव गोविंदना नारायणाची या दिशेने चाललेली वाटचाल पसंत नसल्यामुळे त्यांनी पहिल्याच टर्ममध्ये ते कॉलेज सोडले व मुंबईस सेंट झेवियर कॉलेजमध्ये आपल्या पुतण्याबरोबर दाखल झाले. दोघांचाही अभ्यास बरोबरच चाले. दोघेही प्रिव्हीयसमध्ये नापास झाले. पुन्हा बसले. यावेळी गोविंद वासुदेव सुटले पण नारायण बापूजींची गाडी अडली. अर्थात पुढच्या शिक्षणाची दोरी तुटली.

नारायण बापूजींनी तिसरीकडेच मोर्चा वळविला. त्यांनी कॉलेजला रामराम ठोकला व ते वकिलीचा अभ्यास करू लागले. गोविंद वासुदेव एल्फिन्स्टनमध्ये जाऊ लागले. कॉलेजमध्ये [illegible] इंग्रजी कविता या [illegible] मराठी कवितांत भाषांतर "अनविलास" या नावाने केले.

पुढे गोविंद वासुदेव इंजिनियर म्हणून प्रख्यात झाले. त्यांची पत्नी काशीबाई या मराठीच्या ख्यातनाम लेखिका म्हणून प्रसिद्धी पावल्या. नारायण बापूजी यांनी वकिलीची सनद मिळवून पुण्यात वकिली पेशा स्वीकारला.

कानिटकरांच्या घरात नारायण बापूजींना सर्वजण नानासाहेब म्हणत असत. या कुटुंबात सुधारणावादी म्हणजे कृष्णपक्ष आणि सनातनी म्हणजे शुक्लपक्ष असे दोन तट होते. नानासाहेब व घरातील सर्वजण शुक्लपक्षाचे तर गोविंद वासुदेव व काशीबाई हे दंपत्य कृष्णपक्षाकडे होते.

नारायण बापूजी यांच्याविषयीच्या आठवणी त्यांची पुतणी कु. काशीबाई यांनी आपल्या आत्मचरित्रात नोंदविल्या आहेत. एवढाच त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यावर प्रकाशकिरण पडला आहे. बाकी त्यांचे चरित्र अंधारातच आहे. आज त्यांचे नातू डॉ. एम.बी. कानिटकर (पुण्यात, २०५८ सदाशिव पेठ, एस.पी. कॉलेजजवळ, पुणे ३०) हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे फोटोग्राफर आहेत. आज ते निवृत्त जीवन जगत आहेत तरी आपल्या काळात ते एक उत्तम डॉक्टर म्हणून नावाजले होते. अन् आजही त्यांचा फोटोग्राफीचा छंद [illegible] आहे.

नारायण बापूजींना एकूण अपत्ये झाली. पैकी डॉ. गजानन उर्फ सदानंद बाळकाका हेच वाढले व पुण्याला सार्वजनिक सेवेचे कार्य करून लौकिकास चढले. याशिवाय दोन मुली झाल्या होत्या. पिळूताई हिला कल्याणचे सावकार विष्णुपंत गोपाळराव पिंपळखरे यांना दिली होती. हे दोघेही आज नाहीत. दुसरी कन्या काशीबाई यांचे मुली, पती वगैरे कल्याणकडे आहेत.

स्वतः नारायण बापूजी अल्पायुषी ठरले. १८९७ साली वयाच्या अवघ्या पंचेचाळीसाव्या वर्षी ते निधन पावले. त्यावेळी त्यांचा मुलगा [illegible] उर्फ बाळकाका अवघा अकरा वर्षांचा होता. त्यामुळे बाळकाकांच्या आत्मचरित्रातही आपल्या वडिलांविषयी [illegible] फारशी सविस्तर माहिती मिळू शकत नाही.

नारायण बापूजींना बी.ए. पूर्वीची 'लिटल गो' परीक्षा प्रयत्न करूनही उत्तीर्ण होता आली नाही. तरीही वकिलीच्या व्यवसायात त्यांनी पुण्यामध्ये चांगला लौकिक मिळविला. इतकेच नव्हेतर शहराच्या प्रतिष्ठितांपैकी ते एक होते. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे चिंचवडच्या मोरया गोसाव्यांच्या संस्थानातील भांडणे दूर करून डॉ. गाडगीळांच्या सहाय्याने त्यांनी तेथील कारभाराची एक सुव्यवस्था लावली. त्यांनी सादर केलेल्या विश्वस्त व्यवस्थेच्या योजनेला सरकारने मान्यता देऊन स्वतः त्यांनाही एक विश्वस्त म्हणून नेमले. अखेरपर्यंत ते या जागेवर राहिले. देवस्थानच्या कारभारात चांगली सुधारणा घडविली. त्याचा प्रत्यय आजही येतो.

नारायण बापूजींना त्यांचे मित्र 'पुष्करिणीचे शेक्सपियर' म्हणत असत. ते सनातनी होते. इ.स. १८९२ - ९३ साली पुण्यात ग्रामण्याचा प्रकार गाजला होता. त्याचे असे झाले होते - दोन तीन वर्षांपूर्वी गोपाळराव जोशी यांनी अनेक ढोंगी सुधारक यांचे बिंग फोडण्यासाठी पंचहौद मिशनमध्ये मिशनऱ्यांच्या आर्थिक सहाय्याने चहापान आयोजित केले होते. या चहापानास इतर रानडे-टिळकांबरोबर आगाशे नातू यांच्या नेतृत्वाखाली पुण्याच्या सनातन्यांनी बहिष्कार टाकला. हा शुक्लपक्ष (सनातनी) विरुद्ध कृष्णपक्ष (सुधारक) हा वाद पुण्यात ४-५ वर्षे गाजत होता. अगदी यासाठी शंकराचार्यांनाही पाचारण करण्यात आले.

नारायणराव शुक्लपक्षाचे होते. त्यांचे पुतणे गोविंद वासुदेव व काशीबाई गोविंद हे दांपत्य मात्र कृष्णपक्षातले होते तर काशीबाई आपल्या आत्मचरित्रात लिहितात त्यावरून नारायण बापूजी कट्टर सनातनी होते असे दिसते. आपल्या आग्रही स्वभावामुळे एकदा ते आपल्या [illegible] किंवा मित्रालाही अद्वातद्वा बोलले होते. होळी

दिवशी सातारवाड्याचे अंगणात नारायणराव होळीची पूजा करीत होते. तेथेच ओट्यावर वामन बाळकृष्ण रानडे व गोविंद वासुदेव बसले होते. वामनचे बंधू गंगाधरशास्त्री हे शुक्लयजुर्वेदी. वामनराव हे नारायण बापूंचे जिवलग स्नेही स्वभावाने विनोदी. त्यांनी नारायणरावांच्या होळी पूजनात मध्येच, "होलिका देवताय नमः पोळिकान् समर्पयामि" अशी भर केली. झाले, नारायणराव असे चिडले म्हणता. ते म्हणाले, "हे सुधारक घरात आल्यापासून घरातील पवित्र वातावरण बिघडून गेले आहे. या सुधारक वातावरणामुळे मुलांना दुराणी-बाणी येतात," हे विकोपाला वाढलेले भांडण दादासाहेबांच्या वासुदेव बापूंच्या मध्यस्थीने मिटले.

दुसऱ्या दिवशी धुळवडीचा मेळा काढून निघाल्याच्या लोकांनी सुधारकाची प्रेतयात्रा काढली. प्रेताचे सोंग घेतलेल्या माणसाच्या गळ्यात दारूची बाटली बांधली होती.

नारायण बापूंच्या विचारांच्या या माहितीमुळे त्यांच्या नाटकातील अतिरंजित चित्रणाचा, सुधारणेविरोधींच्या पिढ्यांचेही वृत्तीचा उलगडा होतो. त्यांच्या नाटकातही सुधारणावाल्यांमुळे बिघाड झाल्याचे चित्रण आढळते. तसेच सुधारणा म्हणजे मद्यपान असा ग्रह त्यांच्या लेखनातही आढळतो.

तसेच त्यांच्या सनातनी आग्रहामुळे कुटुंबातही एक तणाव रहात असे. काशीबाई या पुतणी सुनेवर त्यांचा कटाक्ष असे कारण त्या सुधारक होत्या. म्हणून नारायणरावांच्या थोरल्या मुलीच्या म्हणजे चिमुताईच्या लग्नाच्या वेळी काशीबाईंना शुभ कार्यातील कुठल्याही कामाला हात लावू दिला नाही. घरात विविध पदार्थ करण्यासाठी दुसऱ्या स्त्रिया कामे करीत असत अन् काशीबाईंना मात्र स्वतःच्या खोलीत बसून रहावे लागे.

लग्न समारंभकाळात तर [illegible] कमाल झाली, त्यादिवशी सकाळ, पर्यंतेर समारंभ होता. वऱ्हाड्यांना फराळ देण्याकरिता काशीबाई दळण करीत होत्या. एवढ्यात नारायण बापूंनी आपल्या व्याह्यांच्या कर्मठपणाला मान तुकवून काशीबाईंना निम्म्या कामातून उठविले आणि लग्न समारंभादिवशी घरात न राहण्याचा हुकूम दिला.

तसेच गोविंद वासुदेव यांच्या पंक्तीला न बसण्याचे व्रत नारायण बापूंनी पाळले असे. मात्र दादांच्या पंक्तीला असले की गोविंद वासुदेवला पंक्तीबाहेर टाकण्याचे किंवा स्वतः उठून जाण्याचे धाडस त्यांना होत नसे.

याबाबत नारायणराव आपल्या वडील बंधूंना मान राखत होते पण कट्टर सनातनी होते, असे दिसते. याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते लोकमान्यांचे स्नेही होते. चिपळूणचे बाळकाका लोकमान्य टिळक व नारायण बापूजी हे तिघे महाराष्ट्रातील किल्ले पाहण्यासाठी पायपीट करीत हिंडले होते. ही आठवण त्यांचे नातू पुण्याचे डॉ. एम. वी. कानिटकर यांनी सांगितली.

कट्टर असलेल्या नारायण बापूंच्या मनावर एक मवाळ कोपरा काशीबाईंनी आपल्या आत्मचरित्रात उद्धृत केला आहे. त्यांनी काशीबाई व गोविंदराव सुधारक म्हणून बहिष्कारीत मानले होते पण त्यांच्या तीन मुलांना मात्र बहिष्कारी न मानता जवळ केले होते. कालांतराने प्रायश्चित्त म्हणजे ब्राह्मणास वीस रुपये देऊन व पंचगव्य घेऊन गोविंदराव व काशीबाई पावन झाले. तरी नारायणरावांच्या मनातली त्यांच्याविषयीची किल्मिषे दूर झाली नाहीत. त्यांनी आपल्या मुलाबरोबर काशीबाईंच्या मुलांच्या मुली, सुनेसारखी केल्या. त्यावेळी त्यांना लिहिलेली की, "तुम्ही आमच्याकडील मुलीला येऊ नये."

अशा इतक्याही बाण्यामागे त्यांची आकांक्षा नाटू यांच्याशी ही मैत्री होती ही कारण असावी. हे नाटू संस्थानी दुरभिमानी मंडळींचे पुढारी होते. शिवाय त्यांचे मित्र असलेले नारायण बापूजीही स्वाभाविकपणे एक पाऊल पुढेच होते. म्हणूनच तर पहिली नागपुरची बैठक झाली तेव्हा नारायणराव पुण्याहून व काशीबाई पलीकडे सोलापूर जिल्ह्यातून नागपुरला जाण्यास दोघे याठिकाणी एकाच डब्यात स्नेहासोबत येऊनसुद्धा त्यांनी या जोडप्याशी हे सुधारक म्हणून बोलणेसुद्धा केले नाही. इतकेच नव्हे तर नागपुरात हरी महादेव पंडित या स्नेह्यांकडे हे दांपत्य उतरले तर नारायण बापूजी पूर्वी ठरल्याप्रमाणे पंडितांकडे न उतरता कोठेतरी अन्यत्रच उतरले.

हा सुधारकांवरचा राग त्यांच्या बारही नाटकात दृग्गोचर होतो. 'तरुणी शिक्षण नाटिकामध्ये चिमणी, रघु, मालिनी आधुनिक शिक्षण व सुधारणांमुळे वाया गेल्या ~~पूर्ण बिघडली~~. परशुराम अतिमद्यपानाने अति अनाचाराने हालअपेष्टा भोगून मृत्यू पावला. त्याच्या पत्नीने आत्महत्या केली. शकू पुनर्विवाह करूनसुद्धा पुनः विधवा झाली अशी सर्व सुधारकांची वाताहत झाली मात्र रमा - विद्युलता हे सनातनी परंपरेला धरून राहिलेले जोडपे सुखात नांदत राहिले.

संमति वयाचे नाटक - यात तर सुधारणावाल्यांनी संमतिवयाचा कायदा करण्याचा इंग्रज सरकारकडे आग्रह धरला. या कायद्यातील एका कलमामुळे नवऱ्याला काळ्यापाण्याची शिक्षा झाली. त्याच्या बायकोने आत्महत्या केली. सदोबाच्या हाताखाली कारभारी विठ्ठलाच्या काशीस निघून गेले. घराची नासधूस कोर्टापाशी सर्व पडली. कलंकित झालेला भाऊ बरावर झाला तर फिर्यादी साक्षी खोटी होऊन दारोदार भटकू लागली. एका सुधारणेने इतका सत्यानाश केला.

'प्रायश्चित्त' नाटकात सुधारणा म्हणजे पुष्टावर धाकाची करणी असे पुढील तत्त्व असलेले पद्य संवादातून स्पष्ट होते.

आणि मल्हारराव महाराज नाटक तत्कालीन घडलेल्या घटनेवर आधारीत असल्यामुळे सुधारणेच्या आघाडीवरील सिद्धान्तांची कृती प्रकटण्यास वाव नव्हता. तरीपण दादाभाई यांनी नव्या सुधारक मंडळींच्या राज्यसुधारणेच्या योजना महाराजांना मान्य करून ते या मंडळींना पाठवून देतात. शिवाय या "सुधारणेवाल्यांचा" राज्यात राब चालल्यापासून राज्यावर केवढी संकटे आली आहेत असे संवादातून दाखवून आपला सुधारणा विरोध दर्शवणी नोंदवलाच आहे.

तरी अशा प्रकारचे पेशाने वकील कृतीने सनातनी असलेले नारायण बापूजी कानिटकर इ.स. १८९७ साली २५ जुलैला कॉलरा होऊन निधन पावले. ही बातमी लोकमान्यांना कळली तेव्हा ते त्यांच्या वाड्यावर पायवेगाने धावले होते. त्यांच्यामागे अकरा वर्षांचा मुलगा होता त्याचा सांभाळ रा.न. वासुदेव बापूजी कानिटकरांनी केला.

त्यांची नाट्यसंपदा — त्यांनी इ.स. १८७५ ते १८९७ पर्यंत तेरा नाटके लिहिली. ती येणेप्रमाणे -

१) मल्हारराव गायकवाड यांचे नाटक - १८७५ (बडोदे चित्र प्रकरण)
२) शशिकला - रत्नपाल (रोमिओ ज्युलियटच्या आधारे) १८८२
३) प्रतापराव चंद्रानना ("केनिलवर्थ" कादंबरीच्या आधाराने) १८८३
४) तरुणी शिक्षण नाटिका (सामाजिक) १८८६
५) शिवाजी नाटक (ऐतिहासिक) १८८५
६) नार्यविक्रय (क्रॉफर्ड प्रकरणावर) १८८९
७) बाजीराव मस्तानी (ऐतिहासिक) १८९२
८) संमतिकायद्याचे नाटक (सामाजिक) १८९१
९) भावी सुधारणा प्रदीप-(सामाजिक अनुदित) १८९२

१०) बाजी देशपांडे (ऐतिहासिक) १८९४

११) राजाराम नाटक (ऐतिहासिक) (अपूर्ण) १८९५

१२) प्रतापगडचा मोहरा (ऐतिहासिक, अपूर्ण) १८९७

१३) कुंदोजी कान्होजी (ऐतिहासिक, अपूर्ण)

या नाटकांपैकी अनेक रंगभूमीवर आली, लोकप्रिय झाली, त्यांच्यामुळे शाहूनगरवासी मंडळी, पुढचे संगीत मंडळी, स्वदेशहितचिंतक मंडळी यांना चांगली अवस्था आली. शाहूनगरवासी मंडळीचे "बाजी देशपांडे" इतके गाजले होते की त्यातील ऐतिहासिक प्रसंगाने प्रेक्षकांची मने दुखावली गेली, वातावरण तापले. त्यांनी एकदा नाटक सुरू असता पडदे जाळले आणि एकदा गणपतराव जोशांवर हल्ला करून त्यांना जखमी केले. शेवटी प्रयोग करणे बंद करावे लागले.

तसेच खळबळ उडविणारी दोन नाटके - तरुणी शिक्षण नाटिका व संमतिवयाचे नाटक.

'तरुणी शिक्षण नाटिका' हे एक Satire - उपहासगर्भ अनिष्ट सुधारणावर टीका करणारे नाटक आहे. पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना वाचून लेखकाची सुधारकी समाजहितचिंतक भूमिका आवडी किमान वाचकांना पटण्यासारखी वाटते.

पुण्यात १८९१ साली संमतिवयाच्या बिलावर जोरदार वाद झाले. त्यातून कोर्टापर्यंत वैमनस्य वाढले होते. नारायणरावांनी सनातन्यांची बाजू मांडण्यासाठी उपहासपर नाटक लिहिले ते सुधारकांना झोंबले. त्यासाठी या नाटकावर "ज्ञानप्रकाशा"त टीका येई तर "केसरी"मध्ये त्याची भलावण येई. तसेच "विविध ज्ञान विस्तारा"ने तरुणी शिक्षण नाटिकेत स्त्रियांच्या एका विकल मनाने हवे तसे तोंडसुख घेऊन गहजब उडविला होता.

तसेच त्याकाळात गाजलेल्या शिरडीत सम्राट कृपाळ यांच्या तालुकदारीच्या घटनेवर आधारलेले न्याय विजय आणि त्याच काळात बडोदा संस्थानावर ओढवलेल्या संकटाची कहाणी सांगणारे मल्हारराव महाराज नाटक ही यांची नाटके लेखकाचा तत्कालीन समाजस्थितीचा व्यासंग दाखवतात. समाजाच्या घडामोडीविषयी ते जागरूक होते आणि त्यांच्या लेखनाविषयी समाजही जागृत होता हे समाजातील स्थित्यंतरांची नोंद घेत होते तसा समाज त्यांच्या लेखनाची दखल घेत होता, असे वाटते.

याशिवाय सुधारकांवरील सडकून टीकेमुळे एका दिवसात लिहिलेले 'भावी सुधारणा प्रदीप' हेही लोकप्रिय झाले.

त्यांच्या कवि जीवनाचे आणखीन एक अंग म्हणजे कवित्वाचे. त्यांनी नाटकांतून खूप सुंदर कविता घातल्या आहेत. त्यांनी आपला उद्देश कथानकाचे सूत्र काव्यरूपाने दिले आहे, याशिवाय इ.स. १८७२ मध्ये 'अजविलाप' हे रघुवंशाच्या आठव्या सर्गावरील काव्य पुण्याच्या सहाय्याने रचले होते.

अन्य ग्रंथ — दिवाणी कामकाज चालविण्याच्या कायद्यासंबंधी त्यांचे एक पुस्तक आहे.

वृत्ती विशेष - ते अस्सल राष्ट्रीय वृत्तीचे होते. लोकमान्य टिळकांच्या सार्वजनिक कामात भाग घेत असत. सनातनी असले तरी देशभक्त होते व स्वदेशाभिमानातूनच रायगड स्मारकाच्या वेळी लोकमान्यांच्या बरोबर महाराष्ट्रातील मुख्य किल्ले पाहून आले होते. लोकमान्यांचा सहवास त्यांना लाभला होता. एवढेच नव्हे तर लोकमान्यांच्या विचारांना ते आपल्या नाटकांतून रंगवीत अत्यंत पोषक असत. लोकमान्यांचे लेखन स्पष्ट, आवेशपूर्ण धारदार, जळजळीत.

अशा प्रकारच्या लेखनातून नैतिक बाजूही साधली गेली तर भावोद्दीपक लेखन नाट्यपण जपूनही. त्यांनी समाजातील सामान्य लोकांच्या भावनांचे चेतविण्याचे काम केले असेल नव्हे तर धर्मलिखाणावर टीका विरोधी भांडारकर व अन्य सुधारकांची प्रोत्साहनास उभविलेली सभा उधळण्याच्या कामातही ते पुढे होते.

याशिवाय तत्कालीन पांढरपेशांच्या मनात जागृत झालेल्या देशाभिमानाची प्रतिके राजा शिवाजी, बाजी देशपांडे, बाजीराव मस्तानी इ. नाटकांतून आढळतात.

एकूणच १९ व्या शतकाच्या सरत्या कालखंडातील सनातनी पांढरपेशा वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे असे हे नाटककार होते.

* * *